# Dr. D. Y. Patil Vidyapeeth, Pune

## (Deemed to Be University)

## Dr. D. Y. Patil Medical College, Hospital & Research Centre,

## Pimpri, Pune

## मराठी भाषा दिन ''संपर्क भाषा म्हणून मराठीचे महत्व '' या विषयावर व्याख्यान

दिनांक ४/३/२०२० रोजी डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविदयालय, पिंपरी, पुणे येथे मराठी भाषा दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सदर कार्यक्रम व्याख्यान कक्ष २ येथे दुपारी २ ते ४ या वेळात घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. डी. वाय. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पिंपरी, येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. शामराव गायकवाड यांना पाचारण करण्यात आले होते .

सदर कार्यक्रम मा. डॉ. भाग्यश्री पाटील मॅडम आणि मा. डॉ. यशराज पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

डॉ.दाक्षायणी पंडित, प्राध्यापक, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. वैद्यकीय महाविद्यालयातील शरीरक्रिया शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जलताडे यांनी प्रास्ताविक केले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. शामराव गायकवाड यांनी "संपर्क भाषा म्हणून मराठीचे महत्व" या विषयावर अभ्यास पूर्ण व्याख्यान दिले.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भवाळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी महाराष्ट्राबाहेरून येतात. रुग्णांशी संपर्क साधताना मराठी भाषा येत नसल्याने अडचण होते. रुग्णांशी नीट संवाद साधता यावा व रोगनिदानास मदत व्हावी यासाठी या विद्यार्थ्यांना जुजबी मराठी येणे आवश्यक आहे, असे डॉ. भवाळकर यांनी सांगितले. शेवटी डॉ. खेडकर, प्राध्यापक, सामाजिक वैद्यक विभाग यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. सदर कार्यक्रमास वैद्यकीय महाविद्यालयातील मान्यवर व विद्यार्थी मिळून सुमारे दीडशे श्रोते उपस्थित होते.